


इतिहास

# वार्षिक अहवाल

2022-23

## श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री


DINESH KACHKURE
ASSISTANT PROFESSOR

VIJAY PANDE
HEAD & ASSO. PROF.

# हैदराबाद मुक्तीसंग्राम दिन

| | |
|---|---|
| **कार्यक्रमाचे नाव:** | **हैदराबाद मुक्तीसंग्राम दिन व्याख्यान** |
| **विभाग:** | इतिहास |
| **कार्यक्रम पद्धती:** | व्याख्यान |
| **दिनांक:** | **17 सप्टेंबर 2022** |
| **वेळ:** | 9.00 स. |
| **सुत्रसंचलन:** | कु. मंजुषा पेरकर |
| **आभार :** | कु. आकांक्षा क्षीरसागर |
| परिचय: | कु. प्राजक्ता इंगळे |
| **अध्यक्ष:** | डॉ. एस. आर. टकले |
| **सहभागी:** | प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी-<br>श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री<br>एकूण : 28 |
| **स्वरूप:** | ऑफलाईन-महाविद्यालयीन |
| **विषय:** | हैद्राबाद मुक्तिसंग्रामाची ऐतिहासिकता |
| **वक्ते:** | **डॉ. गणेश वाघ,** स्व. बाबूरावजी काळे महाविद्यालय, अजिंठा |

**उद्दिष्टे:**

1. हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिन साजरा करणे
2. जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानातून विद्यार्थ्यांना मुक्तीसंग्राम दिनाविषयी ज्ञान संक्रमीत करणे.
3. मुक्तीसंग्राम लढ्याचे महत्व समजून घेऊन लढ्यात अमर हुतात्म्यांना अभिवादन करणे

**व्याख्यानाचा गोषवारा:**

महाविद्यालयात श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री इतिहास विभागांच्या वतीने दिनांक 17 सप्टेंबर 2022 रोजी सकाळी 9:00 वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त डॉ. गणेश वाघ यांचे हैद्राबाद मुक्तिसंग्रामाची ऐतिहासिकता या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. त्यामध्ये हैद्राबाद राज्याचा महत्वपूर्ण भाग असलेल्या मराठवाडा आणि त्याच्या इतिहासाविषयी मांडणी करण्यात आली. तसेच हैद्राबाद राज्यात स्थापन झालेले निजामाचे

राज्य, त्यांच्याकडून संस्थानातील प्रजेवर होणारे अन्याय, अत्याचार यामुळे जनतेने निजामाच्या आणि रझाकारी सैन्याविरोधात लढलेला उत्स्फूर्त लोकलढा आणि या लोकलढ्यामुळे 17 सप्टेंबर 1948 रोजी स्वतंत्र झालेले हैद्राबाद संस्थान याविषयी सविस्तर प्रतिपादन करण्यात आले. धर्माच्या आधारावर कोणतेही राज्य फार काळ टिकून राहू शकत नाही, हे आपल्याला हैद्राबादच्या इतिहासाकडे पाहून कळते, या विषयी भाष्य केले.

हा कार्यक्रम ऑफलाईन स्वरुपात महाविद्यालयात घेण्यात आला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मंजुषा पेरकर हिने तर आभार प्रदर्शन कु. आकांक्षा क्षीरसागर हिने केले. पाहुण्यांचा परिचय कु. प्राजक्ता इंगळे या विद्यार्थिनीने करून दिला. कार्यक्रमाचे प्रा. डॉ. दिनेश कचकुरे व प्रा. विजय पांडे यांनी आयोजन केले.






हैदराबाद मुक्तीसंग्राम दिन प्रसंगी व्याख्यान देतांना डॉ. गणेश वाघ




हैदराबाद मुक्तीसंग्राम दिन व्याख्यान प्रसंगी सर्व कर्मचारी

# भित्तीपत्रक प्रकाशन 1

इतिहास विभागाच्या वतीने 17 सप्टेंबर म्हणजेच हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनी प्राजक्ता इंगळे, आकांक्षा शिरसागर, मंजुषा पेरकर यांनी संपादित केलेल्या "वय तीसीच्या आत आणि देशासाठी कुर्बान..." या भितीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यात भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या धगधगत्या यज्ञामध्ये आपल्या प्राणाच्या समिधा अर्पण करणाऱ्या तरुण क्रांतिकारकाविषयी माहिती देण्यात आली.

या भितीपत्रकाचे प्रकाशन 17 सप्टेंबर 2022 रोजी म्हणजेच हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनी डॉ. गणेश वाघ आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या हस्ते करण्यात आले.



# अतिथी व्याख्यान 1

इतिहास विभागाच्या वतीने दिनांक 15 ऑक्टोबर 2022 रोजी सकाळी 10 वा वाजता प्रा .डॉ . व्यंकटेश लांब, उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख, इंद्रराज महाविद्यालय सिल्लोड यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले.  यावेळी त्यांनी बीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना पेपर क्रमांक 2 मधील दुसरे नागरीकरण या भागाचे अध्यापन केलेयाप्रसंगी त्यांनी . सिंधू संस्कृतीतील प्रथम नागरीकरणानंतर महाजनपदांच्या कालखंडामध्ये दुसरे नागरीकरण कसे उदयास आले याविषयी सविस्तर माहिती सांगितली.




# भित्तीपत्रक प्रकाशन 2

इतिहास विभागाच्या वतीने दिनांक 16 मार्च 2023 रोजी राजर्षी शाहू व्याख्यानमाला कार्यक्रमात महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी गायत्री पवार, मनीषा कुदळे, उर्मिला ढोके यांनी संपादन केलेल्या हैदराबाद संस्थान या भित्तिपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.

त्यात हैदराबाद संस्थानाची पार्श्वभूमी, निजाम शब्दाविषयी माहिती, हैदराबादचे 7 निजाम व त्यांचा कार्यकाळ, हैदराबाद संस्थानाची लोकसंख्या व क्षेत्रफळ, हैदराबाद संस्थानाची भाषा, हैदराबाद संस्थानांची विभागणी याविषयी माहिती देण्यात आली. या भित्तीपत्रकाचे प्रकाशन राजर्षी शाहू व्याख्यानमालेचे वक्ते प्रा. डॉ. सुनील पिंपळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, इतिहास विभागप्रमुख प्रा. विजय पांडे यांच्या हस्ते करण्यात आले.



**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय**

इतिहास विभाग

भित्तीपत्रक

## हैदराबाद संस्थान

15 ऑगस्ट 1947 रोजी हिंदुस्तान स्वतंत्र झाला. पण तीन संस्थानांनी भारतात सामील होण्यास नकार दिला. यामध्ये दक्षिणेतील हैदराबाद, उत्तरेतील काश्मीर आणि जुनागड ही ती संस्थाने. हिंदुस्थानात छोटीछोटी मिळून एकूण 565 संस्थाने होती. यापैकी स्वातंत्र्यानंतर स्थापित भारतीय संघराज्यात ही 3 वगळता सर्व संस्थाने विलीन झाली. भारतीय स्वातंत्र्यप्रसंगी सातवा निजाम मीर उस्मान अलीखान बहाद्दूर हा हैदराबादच्या तख्तावर होता

**निजाम शब्दाविषयी..**

§ निजाम हे नाव नसून मोगल बादशहाकडून मिळालेली एक पदवी

§ निजाम शब्दाचा अर्थ होतो प्रशासक किंवा व्यवस्थापक

**हैदराबादचे 7 निजाम व त्यांचा कार्यकाळ**

| | |
|---|---|
| 1. मीर कमरुद्दिन /चिनक्लीज खान | 1724 - 1748 |
| 2. मीर निजाम आली | 1763 - 1802 |
| 3. मीर अकबर अली | 1803 - 1829 |
| 4. अलीखान नासिरउद्दोला | 1829 - 1857 |
| 5. निजाम असफउद्दोला | 1857 - 1861 |
| 6. मीर मेहबूब अली | 1861 - 1911 |
| 7. मीर उस्मान अली खान | 1911 - 1948 |

**शासक**
मुस्लिम

**लोकसंख्या**
1,63,38,534
हिंदू – 85 %
मुस्लिम - 11 %

**क्षेत्रफळ**
2,15,626.88 चौ.किमी.

**भाषा:** 50 % तेलुगू भाषिक, 25 % मराठी भाषिक, 15 % कन्नड भाषिक, 10 % उर्दू भाषिक

**संस्थानची विभागणी** एकूण १६ जिल्ह्यांत


- **तेलुगू भाषिक (तेलंगण)**- वरंगळ, करीमनगर, निजामाबाद, नलगोंडा, महबूबनगर, आदिलाबाद, मेदक व हैदराबाद - 8 जिल्हे.
- **कन्नड भाषिक (कर्नाटक)** - गुलबर्गा, रायचूर व बीदर - 3 जिल्हे.
- **मराठी भाषिक (मराठवाडा)**- औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, परभणी व नांदेड- 5 जिल्हे

संपादक: गायत्री पवार, मनीषा कुदळे, उर्मिला ढोके

# अतिथी व्याख्यान 2

महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने द्वितीय सत्रामध्ये दि. 14 मार्च 2023 रोजी बीए तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रा. डॉ. प्रभाकर मिरकड, इतिहास विभागप्रमुख, मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन जि. जालना यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

प्रा. डॉ. प्रभाकर मिरकड यांनी बीए तृतीय वर्षाच्या या विद्यार्थ्यांना इतिहासाच्या शाखा या पेपरमधील “पर्यटनाचे प्रकार” या घटकावर अध्यापन केले.



# प्रश्नमंजुषा स्पर्धा-स्वातंत्र्याचा अभिमानी इतिहास

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री येथील इतिहास विभाग व इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व महाविद्यालयाचा रौप्यमहोत्सव यानिमित्ताने तालुक्यातस्वातंत्र्याचा अभिमानी इतिहास या विषयावर दिनांक **9 ऑगस्ट 2022** रोजी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत एकूण 30 गुणांसाठी 30 वस्तुनिष्ठ प्रश्न विचारण्यात आले होते. या स्पर्धेत श्री संत सावता गुरुकुल फुलंब्री येथील दहावी मराठीचे 29, दहावी सेमीचे 60, इयत्ता अकरावीचे 16 व बारावीचे 34 विद्यार्थी, राजे छत्रपती विद्यालय, डोंगरगाव कवाड येथील 37 विद्यार्थी, इंद्रायणी उच्च माध्यमिक विद्यालय, डोंगरगाव कवाड येथील 18 विद्यार्थी, कै. राधाबाई वानखेडे विद्यालय, फुलंब्री येथील 30 विद्यार्थी, जिल्हा परिषद प्रशाळा फुलंब्रीचे दहावी ब चे 20 विद्यार्थी, दहावी अ चे 22 विद्यार्थी, दहावी उर्दूचे 11 विद्यार्थी, जिल्हा परिषद उच्च माध्यमिक विद्यालयाचे 9 विद्यार्थी, समता विद्यालय, फुलंब्री येथील 22 विद्यार्थी, परमानंद विद्यालय, पाल फाटा येथील 24 विद्यार्थी, भारतमाता विद्यालय, फुलंब्री येथील 23 विद्यार्थी, ज्ञानसागर हायस्कूल, पाल फाटा या इंग्रजी शाळेतील 16 विद्यार्थी, जिल्हा परिषद प्रशाळा, गणोरी येथील 86 विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेत **विविध 16 शाळा-महाविद्यालयातील एकूण 457 विद्यार्थी सहभागी** झाले.

या स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक संपादन केलेले विद्यार्थी खालील प्रमाणे.

| **प्रथम** | दुतोंडे सिद्धी |
|---|---|
| **द्वितीय** | बुधवंत शिवशंकर |
| **तृतीय** | जाधव अक्षय |
| | मोराणकर मृण्मयी |
| | पांडे श्रुती |
| **उत्तेजनार्थ** | गायकवाड सिद्धी |

# आंतरमहाविद्यालयीन वैचारिक लेख

श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव रंगारी जि. औरंगाबाद महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्ताने **"आंतरमहाविद्यालयीन वैचारिक लेख स्पर्धा"** आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी आमच्या महाविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांचे लेख पाठवण्यात आले.

1. मनीषा गौर (बी. ए. प्रथम वर्ष) : मराठवाड्याच्या संदर्भात हैदराबाद मुक्तीसंग्राम: भारतीय स्वातंत्र्याची परिपूर्ती
2. पूजा ढोके (बी. ए. द्वितीय वर्ष) : हैदराबाद मुक्तिसंग्रामात मराठवाड्याचे योगदान
3. प्राजक्ता इंगळे (बी. ए. द्वितीय वर्ष) : स्वामी रामानंद तीर्थ: मुक्तीसंग्रामातील योद्धा संन्यासी
4. मंजुषा पेरकर (बी. ए. द्वितीय वर्ष) : तर... हैदराबाद मुक्तीसंग्राम झालाच नसता
5. आकांक्षा क्षीरसागर (बी. ए. द्वितीय वर्ष) : हैदराबाद मुक्तिलढ्यात महिलांचे योगदान

या आंतरमहाविद्यालयीन वैचारिक लेख स्पर्धेत महाविद्यालयाची विद्यार्थिनी मनीषा गोर हिने **तृतीय क्रमांक** संपादन केला.

# हैदराबाद मुक्तिसंग्राम प्रदर्शनी

महाविद्यालयाच्या इतिहास विभाग विभागातर्फे हैदराबाद मराठवाडा मुक्ती संग्राम प्रदर्शनी तयार करण्यात आली यामध्ये हैदराबाद मुक्तिसंग्रामातील प्रमुख व्यक्ती, प्रमुख घटना यांच्या माहितीसह हैदराबादच्या निजाम राजवटीविरुद्ध झालेल्या संघर्षाचे एकूण 23 बॅनर तयार करण्यात आले व हे बॅनर फुलंब्रीतील विविध शाळा महाविद्यालयामध्ये प्रदर्शन भरून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. हे प्रदर्शनी एकूण 1000 विद्यार्थ्यांनी पाहिली.





महाविद्यालयात महाविद्यालयात आमचे महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने 16 मार्च 2023 रोजी राजर्षी शाहू व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी वक्ते म्हणून प्रा. डॉ. विकास सुकाळे, प्राध्यापक व विभागप्रमुख, पदव्युत्तर विभाग, पीपल्स महाविद्यालय, नांदेड व प्रा. डॉ. सुनील पिंपळे, प्राध्यापक व विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग, लोकसेवा महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर हे उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे होते. कार्यक्रमाचे आयोजन समन्वयक प्रा. विजय पांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन महाविद्यालयाची विद्यार्थिनी गायत्री पवार व आभार प्रदर्शन उर्मिला ढोके या विद्यार्थ्यांनी केले.

याप्रसंगी राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक व राजकीय विचार या विषयावर बोलताना प्रा. डॉ. सुनील पिंपळे म्हणाले की प्रजा हितदक्ष राजा म्हणून आपण शाहू महाराजांचा उल्लेख करतो. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केल्याने पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झालेली आपल्याला दिसून येते. महिलांचा न्यूनगंड कमी करण्यासाठी शाहू महाराजांनी विशेष प्रयत्न केले होते. तसेच अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांचे कार्य विशेष स्वरूपाचे दिसून येते.

राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक व सामाजिक विचार या विषयावर प्रा. डॉ. विकास सुकाळे हे म्हणाले की 600 संस्थानांपैकी फक्त शाहूंचाच अभ्यास आपण का करतो हे महत्त्वाचे आहे. शाहूंचा जातीयंताचा लढा हा जातीव्यवस्थेच्या प्राबल्य काळातील दिलेला लढा होय. त्यांचे विचार हे कृतीतून दाखवून दिले म्हणून त्यांना कृतिशील राजा म्हणून ओळखले जाते. त्यांच्या कार्यात पानवटे सर्वांसाठी खुले करणे, दलितांच्या घरी चहापान करणे, वेठबिगारी बंद करण्याचा निर्णय, जाती आधारित बलुतेदारी बंद करणे, केशवपन बंदी विधवा विवाहास मान्यता देणारा कायदा, आंतरधर्मीय, आंतरजातीय, आंतरप्रांतीय विवाहास मान्यता देणे, मुरळी बंदी जोगत्या बंदी अशा सुधारणा केल्या. सत्यशोधक समाजाचे पुनर्जीवन केले. हरितक्रांतीची मुहूर्तमेड शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात केली. सिंचनासाठी राधानगरी धरणाची निर्मिती, नगदी पिकांना प्रोत्साहन, शेतीसाठी कर्ज पुरवठा

अशा सुधारणा केल्या. उद्योग क्षेत्रात उद्योगांचा सर्वे केला. सुगंधी, जिनिंग, मधमाशीपालन असे उद्योग सुरू केले. व्यापार क्षेत्रात शाहूपुरी बाजारपेठ, पन्हाळा नंबर आणि चहा, गुळ निर्मिती केली. व्यापाऱ्यांना कर माफ केला. सहकार कायद्याची अंमलबजावणी, 1912 मध्ये पतपुरवठा संस्था काढली. कल्याणकारी राज्याचे कार्य रयतेच्या हितातच राज्याचे हित, रयतेच्या सुखातच राजाचे सुख या राजाने मानले.




राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक व सामाजिक विचार विषयावर बोलताना प्राविकास सुकाळे .डॉ .



उपस्थित विद्यार्थी




राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक व राजकीय विचार या विषयावर बोलताना प्रा .डॉ .सुनील पिंपळे



अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉटकले .आर .एस .

# राज्यस्तरीय कार्यशाळा

## छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवानिमित्त
## एक दिवशीय राज्यस्तरीय कार्यशाळा "मराठ्यांच्या इतिहासाचे पुनर्लेखन"

**कार्यक्रमाचे नाव** : राज्यस्तरीय कार्यशाळा "मराठ्यांच्या इतिहासाचे पुनर्लेखन"

**विभाग** : इतिहास

**कार्यक्रम पद्धती** : कार्यशाळा

**दिनांक**: 20 फेब्रुवारी 2023

**वेळ** : सकाळी 11:00 वाजता

**सूत्रसंचालन** : कु. प्राजक्ता इंगळे

अध्यक्ष : डॉ. पांडुरंग कल्याणकर

**सहभागी महाविद्यालय**:

- श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री
- राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री
- पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, औरंगाबाद

**एकूण सहभागी**: 150

**स्वरूप** : ऑफलाईन, राज्यस्तरीय

**विषय** : मराठ्यांच्या इतिहासाचे पुनर्लेखन

**उद्दिष्टे :**

1. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव साजरा करणे
2. कार्यशाळेतून मराठ्यांच्या इतिहासाच्या पुनर्लेखनाविषयी जागृती करणे

3. मराठ्यांच्या इतिहासाच्या पुनर्लेखनाचे महत्त्व अधोरेखित करणे

**कार्यक्रमाचा गोषवारा :**

महाविद्यालयात श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री, राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री आणि पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 20 फेब्रुवारी 2023 रोजी सकाळी 11.00 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात **प्रो. सर्जेराव बनसोडे**, सहयोगी प्राध्यापक, पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, औरंगाबाद यांचे मराठ्यांच्या इतिहासाचे पुनर्लेखन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या विषयावर बोलताना प्रो. सर्जेराव बनसोडे यांनी सर्वप्रथम मराठ्यांच्या इतिहास लेखनप्रवाहाचा आढावा घेतला. साम्राज्यवादी इतिहासकार ग्रँड डफ याने मराठा सत्तेच्या उदयासंबंधी मांडलेला वणव्याचा सिद्धांत राष्ट्रवादी इतिहासकार न्या. रानडे यांनी कसा खोडून काढला याविषयी भाष्य केले. सद्यकाळामध्ये मराठ्यांच्या इतिहासाचे पुनर्लेखन होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण छत्रपती शिवाजी महाराज, तसेच मराठ्यांच्या इतिहासाविषयी अनेक वाद आणि मतभेद आहेत. त्यामुळे सत्य इतिहास सर्व लोकांना समजावा म्हणूनच मराठ्यांच्या इतिहासाचे पुनर्लेखन झाले पाहिजे असे बनसोडे सरांनी प्रतिपादन केले. शिवाजी महाराज आणि मराठ्यांच्या इतिहासाविषयी सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय अशा विविध अंगाने अभ्यास होण्यासाठी सुद्धा इतिहासाच्या पुनर्लेखनाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय सद्यकाळात इतिहासकाराची भूमिका ही न्यायाधीशासारखी आहे आणि त्यामुळे त्याने कोणत्याही घटनेकडे पाहताना तटस्थपणे पाहणे आवश्यक आहे, असे सांगून बनसोडे सरांनी इतिहास पुनर्लेखनातील इतिहासकारांची महत्त्वाची भूमिका विशद केली.

या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्राजक्ता इंगळे या विद्यार्थिनीने केले, तर आभार डॉ. दिनेश कचकुरे यांनी मांडले. यावेळी महाविद्यालयात राजर्षी शाहू महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख डॉ. केशव लहाने उपस्थित होते.



शिवजन्मोत्सव २०२३
निमित्ताने आयोजित
मराठ्यांच्या इतिहासाचे पुनर्लेखन
२० फेब्रुवारी २०२३
डॉ. एस.आर.टकले
ONLY
REDMI K20-PRO
VIJAY PANDE

# लिंकेज (Linkage) अंतर्गत करार

राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री, जि. संभाजीनगर व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री, जि. संभाजीनगर या दोन महाविद्यालयांमध्ये मागील 5 वर्षाचा MOU करार संपल्यामुळे दि. 9 नोव्हेंबर 2022 रोजी लिंकेज (Linkage) अंतर्गत करार करण्यात आला. या करारात विविध कार्यक्रम घेणे, व्याख्यानमाला आयोजित करणे, सेमिनार आयोजित करणे, वेबिनार आयोजित करणे, कार्यशाळा आयोजित करणे, प्रश्नमंजुषा स्पर्धा, पोस्टर प्रदर्शन, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा किंवा इतर स्पर्धा आणि इतर गतीविधींसाठी लिंकेज (Linkage) अंतर्गत करार करण्यात आला.

यावेळी श्री संत सावतामाळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस आर टकले व इतिहास विभाग प्रमुख विजय पांडे तर राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर जाधव व विभाग प्रमुख केशव लहाने यांचे उपस्थिती होती

# « GENDER & CATEGORY WISE STUDENT STRENTH «

| SR. | CLASS | OPEN | | | OBC+SBC | | | SC | | | ST | | | NT+DNT | | | MINORITY | | | PHY-DISABLE | | | GRAND TOTAL | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | M | F | T | M | F | T | M | F | T | M | F | T | M | F | T | M | F | T | M | F | T | M | F | T |
| **01** | **BAFY** | 13 | 17 | 30 | 2 | 12 | 14 | 1 | 3 | 4 | 0 | 0 | 3 | 5 | 3 | 8 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **21** | **35** | **56** |
| **02** | **BASY** | 2 | 6 | 8 | 1 | 8 | 9 | 1 | 1 | 2 | 0 | 0 | 2 | 2 | 3 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **6** | **18** | **24** |
| **03** | **BATY** | 5 | 1 | 6 | 1 | 2 | 3 | 4 | 0 | 4 | 0 | 0 | 5 | 1 | 2 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **11** | **5** | **16** |